श्री.रामदास चव्हाण, अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नांव व पत्ता :- समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे-५
दूरध्वनी क्रमांक :-२५५०१२८१
कार्यालयीन वेळ :- स.९.४५ ते सायंकाळी ६.१५
खात्याचा ई-मेल:- sdd@punecorporation.org
जावक क्रमांक :- सविवि/ २९९५
दिनांक :- ३०/१२/२०२५

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.
अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. १२ /२०२५

अपिलार्थी नांव व पत्ता :-
श्री. राजेश गायकवाड
द्वारा- श्री. शाम साधू ससाणे
रा. स.नं. ११० रामटेकडी, प्रथमा बी रामटेकडी हडपसर,पुणे -४११०१३
मो.नं. 9370144086

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
श्री. असंग पाटील,
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

श्री. राजेश गायकवाड , श्री. शाम ससाणे, श्री. बाजीराव कांबळे श्री. विजय सरवदे --- अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी,पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी दिनांक २८/८/२०२५ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २८/८/२०२५ | २७/९/२०२५ | २६/९/२०२५ | ३०/९/२०२५ | ३/१०/२०२५ |

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक २८/८/२०२५ रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना दिलेल्या माहिती अपुर्ण असल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

| प्रथम अपील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक |
| २५/१०/२०२५ | १३/१०/२०२५ | होय | लागू नाही | १४/११/२०२५ |

**<u>प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-</u>** दिनांक ९/१२/२०२५, स. ११.३० वाजता.

**<u>सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-</u>** दिनांक ९/१२/२०२५ रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: उपस्थित होते.

**<u>सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-</u>** दिनांक ९/१२/२०२५रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

**जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-**

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| 1 | वरील विषयांकित पत्राद्वारे बेरोजगारांच्या सेवा सहारी संस्थेस व लोकसेवा केंद्राबाबत जे चुकीचे धोरण ठरले व अतिरिक्त आयुक्त (इस्टेट) यांचे समोर तसचे महापालिका आयुक्त यांचे समोर मांडण्यात आले. याबाबत जे जबाबदार अधिकारी आहेत त्यांची नाव व पदनाम देणेत यावीत. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळविणेकरीता श्री. राजेश सदाशिव गायकवाड व इतर तीन यांचा अर्ज समाज विकास विभागाकडे प्राप्त झाला आहे. संदर्भ क्र. १ अन्वये आपण मागणी केलेल्या माहितीच्या पानांच्या संख्या ३८ असून प्रती पान रू. २/- याप्रमाणे र.रू. ७६/-चे चलन घेवून कार्यालयीन दिवशी बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे महानगरपालिका शाखा (बँकेची वेळ - सकाळी ११.०० वा. ते सायं. ०४.०० वा. (जेवणाची वेळ दु.०२.०० ते दु.०२.३० सोडून)) या वेळेत येथे चलन भरल्यानंतर आपणांस माहिती उपलब्ध करून देणेत येईल. सदर माहितीमध्ये संदर्भ क्र. २ अन्वये मागणी केलेल्या माहितीचा समावेश आहे. |

**"विवेचन"**

सदर बाबत अपिलार्थी यांनी सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिली ती एकूण ३८ पाने नसून ३१ पानेच आहेत. जन माहिती अधिकारी यांनी खोट्या माहितीच्या आधारावर चलन भरून दिलेले आहे. तसेच आमची आर्थिक फसवणूक सुद्धा झालेली आहे. आम्हाला माहितीच्या अधिकारातील ३८ पाने आहेत असे सांगून त्यांनी आम्हाला ३१ पानेच दिलेली आहेत. यामध्ये आम्हाला दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. तसेच आम्ही मागणी केलेली माहिती व उपलब्ध करून दिलेली माहिती ती नाही. जी माहिती दिली ती अपूर्ण देवून आमची फसवणूक केलेली आहे. म्हणून प्रथम अपिल दि. १४/१०/२०२५ रोजी दाखल केले आहे. असे अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान म्हटले आहे.

**"आदेश"**

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली समाज विकास विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या पानांची संख्या नजर चुकीने ३८ देणेत आली असून आपण जर अर्जाद्वारे मागणी केल्यास उर्वरित जास्तीची रक्कम परत देणेत येईल.

सदरच्या माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाल्याने अपिल निरस्त करणेत येत आहे.

(रामदास चव्हाण)
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

दिनांक :-
ठिकाण :- पुणे.
टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

४) श्री. राजेश गायकवाड द्वारा- श्री. शाम साधू ससाणे
रा. स.नं. ११० रामटेकडी, प्रथमा बी रामटेकडी हडपसर,पुणे -४११०१३

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी